पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/eC229५/२०२४ पिंपरी-चिंचवड दिनांक- २४ /०१/२०२४

## ☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना ☆

मेट्रो प्रकल्पांतर्गत मदर टेरेसा फ्लाय ओव्हर ते भक्ती शक्ती चौक दरम्यान माती परिक्षणकरीता ८१ ठिकाणी लॉग बोअर घेणार असल्याने रस्त्याचे कडेने पार्क करण्यात येणाऱ्या वाहनांमुळे सदर मार्गावर वाहतुक कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाला आहे त्याअर्थी मी विशाल गायकवाड, पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

### निगडी वाहतूक विभाग

| अ.क्र. | ठिकाण | निर्बंध |
|---|---|---|
| १. | भक्ती शक्ती चौकापासुन ते काळभोरनगर अंडरपासपर्यंत तसेच काळभोरनगर अंडरपासपासुन ते भक्ती शक्ती चौक दरम्यान दोन्ही बाजूस | नो-पार्किंग झोन |

तरी वरील ठिकाणी नोपार्किंग झोन घोषीत केलेबाबत अधिसुचना (नोटीफिकेशन) करण्यात येत आहे.

सदरची अधिसुचनेची दिनांक २८/०५ /२०२४ पासुन अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(विशाल गायकवाड)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :
१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) प्रभारी अधिकारी निगडी वाहतुक विभाग
४) कार्यकारी अभियंता, संबंधीत क्षेत्रीय कार्यालय,पिंपरी चिंचवड
/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with OKEN Scanner